# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १२.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ११/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २९९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,२१००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ११/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण १९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २०१ लिटर दारू असा एकुण ८१,१७०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ११/०२/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०६ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १२,२३०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**गुटखा बंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ११/०२/२०२३ रोजी फिर्यादी सोनाजी सुर्यभान आम्ले पोनि ने.पोस्टे हिंगोली शहरयांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी सह कलम २६(२)(प),२६(२)(पअ),२७(२)(म),३०(२)(अ),५९ अन्नसुरक्षा व मानके अधि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील नमुद आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा व मानवी जिवीतास धोका असलेले पान मसाले विक्री करण्याच्या उददेशाने स्वताचे ताब्यात बाळगतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास हिंगोली शहर पोलीस करित आहेत.

**दुखापत दाखल गुन्हे:—**

दि. ११/०२/२०२३ रोजी पोस्टे वसमत ग्रामीण ०२ व बासंबा ०१ व पोस्टे औढा ना. ०१ असे एकुण ०४ गुन्हे कलम ३२४,३२३, ५०६,४२७,३४ भादवी व इतर कलमान्वये दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.